प्रकरण ४ थे

# ''अध्ययन पद्धती''

# प्रकरण 4 थे

## अध्ययन पध्दती

अ) **प्रास्ताविक** ..

या प्रकरणामध्ये मानववंश शास्त्र या शाखेमध्ये यापूर्वी ' जाती आणि जमाती ' संदर्भात उपलब्ध असणा-या वांङमयाचा आढावा घेतलेला आहे. यानंतर प्रस्तुत अभ्यास विषयाच्या संदर्भातील अभ्यास पध्दती संबंधी विवेचन केले आहे. यापूर्वी आदिम जमातींवर झालेल्या समाजशास्त्रीय अभ्यासाच्या आधारे वैदु जमातीचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

कोणत्याही समाजाचा सर्वांगिण अभ्यास करताना त्या समाजातील घटक असलेल्या लहान मोठया समुदायांचा आणि त्यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. ज्या समाजात सांस्कृतिक भेद करणे शक्य आहे असे बहुसंख्य आणि अल्पसंख्य असे समुदाय असतात तेव्हां त्या सर्वांचा अभ्यास केल्याशिवाय त्या समाजाचा संपूर्ण अभ्यास होणे शक्य नाही. भारत हा एक विविधतेने नटलेला देश आहे. भारतामध्ये हिंदु धर्मियांची संख्या जास्त असून येथे मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, बौध्द, शीख व पारशी इ. अल्पसंख्यांकही रहातात. भारतीय समाजाचे ग्रामीण, शहरी व आदिवासी अशा तीन भागात विभाजन झाले आहे. या जाती जमातीमध्ये संघटित वर्ग व असंघटित समुदाय असे फरक दिसून येतात. या असंघटित वर्गात प्रामुख्याने भटक्या जमाती, विमुक्त समाज, वेशीबाहेरचा मोठा अस्पृश्य समाज, आदिवासी व देवदासी यांचा अंतर्भाव करता येईल. भारतीय समाजाचा समग्र अभ्यास करताना विशेषतः राष्ट्राचा विकास व राष्ट्रीय एकात्मता यांच्या संदर्भात वरील सर्व वर्गांचा, जाती जमातींचा विविध धर्मियांचा अभ्यास करणे जरूरीचे आहे. याच पार्श्वभूमीवर वैदू ' या भटक्या आदिम जमातीचा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक दृष्टीकोनातून समग्र अभ्यास, त्यांच्यातील सामाजिक संस्था व त्यांच्यात होत असणा-या परिवर्तनाचा सूक्ष्मस्तरीय अभ्यास करण्याचा हा प्रयत्न आहे.

भाषा, धर्म, जाती आणि भौगोलिक वैशिष्टये याबाबतीत विविधता असणारा भारत हा एक देश आहे. ' या विविधतेतून दिसणारी एकता ' हे भारतीय समाजाचे वैशिष्टय आहे. परंतु हेच वैशिष्टय काही वेळा राष्ट्राच्या विकासातील, राष्ट्रीय एकात्मतेतील अडथळा ठरते. या विविधतेमुळे भारतीय समाजात कित्येक समस्या निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कित्येक शतके असंघटित व उपेक्षित राहिलेल्या जाती जमातीच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा शास्त्रशुध्द अभ्यास करणे महत्वाचे

LIBRARY KOLHAPUR

ठरते. समाजाच्या व्यापक हिताच्या दृष्टीकोनातून त्यांचे प्रश्न लवकरात लवकर सुटणे योग्य होईल.

भारतामध्ये इतर प्रांतपेक्षा महाराष्ट्रांत भटक्या जाती जमातींचे प्रमाण जास्त आहे. महाराष्ट्रांत एकूण 42 भटक्या विमुक्त जमाती आहेत. त्यापैकी 28 भटक्या व 14 विमुक्त आहेत. या 42 जमातींच्या पोटजातींची संख्या 200 पर्यंत आहे. त्यामध्ये संस्कृती, भाषा, व्यवसाय, भौगोलिक परिस्थिती यामध्ये वेगवेगळेपणा आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून 48 वर्षे होऊनही हे लोक अंधश्रध्दा, जुन्या अनिष्ट रूढी, परंपरा, चालीरीती, विवाह पध्दती, सण, उत्सव व राहणीमान यावर विश्वास ठेवतात. यामध्ये शिकार करून उपजीविका करणारे, जनावरे पाळून खरेदी विक्री करणारे, पारंपारिक कलेच्या आधारे लोकांचे मनोरंजन करून जगणारे, हस्तरेषा भविष्य सांगणारे, देवाच्या नांवावर भिक्षुकी करणारे, घरोघरी भिक्षा मागून जगणारे, धार्मिक विधी कार्य करणारे आणि कष्टाची कामे करून उपजीविका करणा-या भटक्या विमुक्त जमातींचा समावेश आहे. शतकानुशतके दुर्बल असणा-या, गुन्हेगार ठरलेल्या, शोषित व दुर्लक्षित अशा भटक्या विमुक्त जाती - जमातींची जीवनपध्दती बहुसंख्य जनतेला माहिती नाही. हा समाजही आता प्रस्थापित समाजाप्रमाणे जीवन जगण्यासाठी पुढे येऊ पहात आहे. जागृत होत आहे. त्यांच्यात परिवर्तन व्हावे म्हणून झटत आहे. अशा या ' आज इथं उद्या तिथं ' राहणा-या भटक्या उपेक्षितांची समाजाला माहिती होणे आवश्यक आहे. याच उद्देशाने या जमातीतील एक जमात - वैदु जमात ' हिचा अभ्यास करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

आ) **उद्देश** ...

वैदु समाज हा उपेक्षित व भटका असा आदिम आहे. या समाजातही रूढी, प्रथा, अंधश्रध्दा यांचे प्रमाण अजूनही जास्त आहे. या सर्व गोष्टीत बदल व्हावा म्हणून ही जमात प्रयत्न करीत आहे. त्यांची पारंपारिक जीवन पध्दती, संस्कृती, रूढी, परंपरा, चालीरीती, देवदेवता, उत्सव, सण, भाषा, पोशाख, व्यवसाय, कला, जात पंचायत यांची समाजाला माहिती झाली पाहिजे. त्यांचे प्रश्न, सामाजिक समस्या समाजाला समजल्या पाहिजेत, त्यांची सांस्कृतिक, आर्थिक स्थिती, त्यांची अभिवृत्ती यांच्यातील परिवर्तन अभ्यासणे गरजेचे आहे. हेच सर्व उद्देश ठेऊन या जमातीचा अभ्यास केला आहे. यादृष्टीने पुढील उद्देश डोळयासमोर ठेऊन हा अभ्यास केला आहे.

1. वैदु जमातीचे सामाजिक जीवन अभ्यासणे.
2. वैदु जमातीच्या धार्मिक प्रथा रीतीरिवाज अभ्यासणे.
3. वैदुंचा पारंपारिक व्यवसाय तपासणे.

4. वैदुंची विवाह पध्दती, कुटुंब संस्था यांचा अभ्यास करणे.

5. वैदु समाजातील स्त्रिचा सामाजिक दर्जा तपासून पहाणे.

6. वैदु जमातीच्या सद्यःकालीन समस्यांचे आकलन करून घेणे.

7. वैदु जमातीचे बदलते जीवन अभ्यासणे इ.

इ) **अध्ययन क्षेत्र** ...

प्रस्तुत सूक्ष्मस्तरीय सामाजिक अभ्यासासाठी सातारा शहरातील ' कामाठीपुरा ' भागातील ' वैदु ' जमातीची निवड केली आहे. सातारा हे जिल्हयाचे ठिकाण आहे. येथे धर्म व जातीनिहाय अशा निश्चित स्तररचना व सामाजिक गट आहेत. सातारा येथे नगरपालिका असून प्राथमिक ते महाविद्यालयीन शिक्षणाची सोय आहे. लहान मोठया उद्योगधंद्यांचा विकास येथे मोठया प्रमाणावर झाला आहे. त्यामुळे आधुनिकीकरणाची प्रक्रिया येथे कित्येक वर्षापासून सुरू आहे. उद्योग व्यवसाय भरपूर असल्याने उपजीविकेची निश्चित खात्री असलेने या शहरात वैदु, कोल्हाटी, डोंबारी, वडार अशा जमाती वास्तव्य करून आहेत. यापैकी वैदु ही जमात येथे रहात असून इतर गावातील सर्व वसाहतींपेक्षा जास्त प्रगतशील जमात आहे. जवळ जवळ 447 पर्यंत यांची लोकसंख्या असून 100 घरे आहेत. सातारा शहराच्या एकंदरीत वातावरणाचा वैदु जमातीवर कितपत प्रभाव पडला आहे हे तपासून घेणे शक्य आहे. बहुपत्नीत्व, घटस्फोट, व्यावसायिक परिवर्तन, विवाह प्रथेतील परिवर्तन, सांस्कृतिक परिवर्तन, शिक्षणाचा प्रसार, कुटुंब नियोजन, अंधश्रध्दा निर्मूलन इ. बाबतीतील परिवर्तनाची वास्तव परिस्थिती वैदुंच्या बाबतीत समजावून घेणे शक्य आहे. म्हणून ' सातारा येथील वैदु जमात ' ही अभ्यासाच्या दृष्टीने एक प्रातिनिधिक क्षेत्र म्हणून निवडली आहे.

ई) **वाङमय - पुनरावलोकन** ...

समाजशास्त्रातील मानववंश शास्त्र या शाखेच्या अंतर्गत यापूर्वी अनेक आदिम जमातींवर संशोधनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. एकाच जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास किंवा एकाच जमातीतील एकाच वैशिष्टयांवर अभ्यास केला गेलेला आढळतो. 1983 मध्ये श्री. के. विश्वनाथ रेड्डी यांनी आंध्र प्रदेशातील चित्तुर जिल्हयातील लोकगीतांचा मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे. लोकगीतातून प्रकट होणारी ग्रामीण समाज जीवन पध्दती यात अभ्यासली आहे. या अभ्यासासाठी क्षेत्र - निरीक्षण पध्दती, मुलाखात पध्दती, विशिष्टाभ्यास पध्दती या पध्दतींचा अवलंब केला आहे. सामाजिक परिवर्तन प्रक्रियेत लोकगीते लोप पावलेली असून फक्त ग्रामीण समाज, आदिम

जमाती यांच्यामध्येच ती सध्या प्रचलीत आहेत. सांस्कृतिक वारसा म्हणून ही लोकगीते जतन करण्याची आवश्यकता आहे असे त्यांनी प्रतिपादन केले आहे. 1986 मध्ये श्री मधुरसुदन जयरथ यांनी ' हिमाचल प्रदेशातील आदिम जमातीच्या राहणीमानाच्या स्तराचा ' मानववंश शास्त्रीय दृष्टीकोनातून तौलनिक अभ्यास केला आहे. हिमाचल प्रदेशातील आदिम जमातीतील सद्यस्थितीतील राहणीमानाचा स्तर अभ्यासणे, त्यांच्या सवयी, अन्न, कपडे, घरे, व्यवसाय, आरोग्य, शिक्षण इ.बाबतीतील परिवर्तन अभ्यासणे, त्यांच्या समस्या अभ्यासणे व राहणीमानाचा स्तर उंचावण्यासाठी काही उपाययोजना सुचविणे या उद्देशांनी हा अभ्यास केलेला आढळतो. यासाठी त्यांनी ' नमुना - निवड तंत्र ' अभ्यास पध्दतीचा वापर केला आहे. याशिवाय खालील समाज शास्त्रज्ञांनी विविध जमातींचा अभ्यास केलेला आढळतो.

इरावती कर्वे यांनी खानदेशातील भिल्ल, महाराष्ट्रांतील आदिवासी यांचा समाज शास्त्रीय अभ्यास केला आहे. जी.ए. खान, आलोक एस. डब्ल्यू. यांनी नोकते नागा यांच्यातील ओरंग संघटनाचा अभ्यास केला आहे. ए. अय्यापन यांनी इराव जमातीतील सांस्कृतिक परिवर्तन व मलबार हिलमधील नायडी जमातीचा समाजशास्त्रीय व शरीरशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे. बेडन पॉवेल यांनी ' लुनार ' व ' सोलार ' या आर्यन जमाती व राजपूत जमातीतील कुळी यांचा अभ्यास केला आहे. ब्रेन ब्रिज यांनी राजमहल टेकडीवरील ' सावरी ' जमात, बाईंगळे ए.एच. यांनी जाट, गुजर, अहिर या जमाती, बसु एम.एन. यांनी बंगालमधील मुंडा, बुनास इ. जमाती, भगवती, आनंद आणि भौमिक यांनी पूर्व बंगालमधील लोढा, संथाळ इ. जमातींचा समाजशास्त्रीय अभ्यास केला आहे. बोस जे.के. यांनी ऐमोल कुर्कीमधील सामाजिक संघटन, कुर्कीमधील धर्मसंस्था, आसाममधील गारो लोकातील गण माकमा समारंभ, वोआंगळा सण, गारो समाजातील आनुवंशिकता इ. चा मानववंश शास्त्रीय दृष्टीकोनांतून अभ्यास केला आहे.

बोस एन.के. यांनी जुआंग जमातीतील लग्नविधी, नातेप्रथा, संघटना यांचा अभ्यास केला आहे. एस. बोस यांनी उत्तर सिक्कीम मधील भोट, डब्ल्यू जी. ब्रीज यांची चमार जमात, चापेकर एल. एन. यांनी सह्याद्रीतील ठाकूर, डब्ल्यू जे. कलशा यांनी पूर्व बंगालमधील संथाळ, पलयहारी, दास के. आ. एस. यांनी जयपूर येथील मीना जमात, दास टी.के. यांनी डलभूम मधील रानटी खारीया जमात, सेराईकेला येथील भूमिक, यांचा समाजशास्त्रीय अभ्यास केला आहे. लीला दुबे यांनी ' गोंड स्त्री ' या विषयावर पी. एच. डी. केली आहे. दुबे एस.सी. यांनी कमार जमात, दत्त, मुजुमदार यांनी संथाळ जमातीतील सांस्कृतिक परिवर्तन यांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला

आहे. एल्विन व्हेरियर यांनी बैगा, मारिया, आगारिया इ. जमाती, महाकौशल लोकांच्या लोककथा, मुरिया व त्यांचे गोतुल, बोंदो, जुआंग इ. जमाती, नेफा लोकपंचे तत्वज्ञान, कला, लोकशाही इ. विषयावर समाजशास्त्रीय अध्ययन केले आहे. एंथोवेन आर.ई. यांनी दख्खन व कोकण भागातील आदिमांच्या देवक प्रथा, पूच व स्टीफन यांनी पूर्व मंडाल्यांतील ' गोंड ' आणि ' भूमिया ', जी.एस.घुर्ये यांनी ' महादेव कोळी व इतर ' वैधानिक जमाती यांचा अभ्यास केला आहे. हुसेन एस.के. एम. यांनी गोंड कोलाम, चेंचु या जमातीतील औषधे, कोया जमात, हटन जे. एच. यांनी अंगामी नागा, सेमा नागा, अय्यर, एल.के. अनंत कृष्णा यांनी म्हैसूर मधील महार जात, मुजुमदार डी. एन. यांनी ' गारो ' जमातीतील संस्कृतीकरण, मुजुमदार एन.पी.एन. यांनी गुजरातमधील भिल्ल समाजाचा समाजशास्त्रीय अभ्यास केला आहे.

मेहता बी. एच. यांनी गोंड व गोडवन प्रदेश, मिल्स जे.पी. यांनी ल्होटा नागा, ओ-नागा, रेंगमा नागा इ. जमातीचा अभ्यास केला आहे. मुखर्जी बी.बी. - संथाळ जमात, गारो जमात, मुखार्जी सी.एल. - संथाळ जमात, नाईक टी.बी. - भिल्ल, अभुज मारिया, पुणेकर व्ही.बी. मुबंईतील सोनकोळी, राघवन् एम.डी. - जैन कुरूंब जमातीची जीवन पध्दती व सवयी रिव्हर्स - तोडा जमात, राऊत एस.जी. - जुआंग जमातीतील सांस्कृतिक परिवर्तन, कोलहांडी येथील ' भुईया ' जमातीतील सामाजिक संघटन, रॉय जी. एस. - कोल्हू जमातीतील लोकगीते यांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे.

रॉय एस.सी. यांनी मुंडा व त्यांचा देश, छोटा नागपूर येथील ओरायन, राजपुताना येथील काळे भिल्ल, छोटा नागपूर मधील बिरहोर जमात, ओरिसा येथील भुईया, रॉय एस. सी. व रॉय पी.सी. यांनी खारिया जमात, रूहेला सत्यपाल - गुडेलिया लोहार, सरकार एस.एम. यांनी राजकमल टेकड्यावरील मलेर जमात, शाह पी.जी. यांनी दाबला नाईक या गुजराथी जमाती, शुक्ला बी.के. यांनी सबसिरी प्रदेशातील डफळा जमात, सुरजित सिन्हा यांनी भूमजी क्षत्रिय जमात, स्मिथ डब्ल्यू सी. - आसाममधील ओ - नागा जमात, सोळंकी ए.एन. - गुजराथमधील धोडिया जमात, सोलेतोर एस.एन. यांनी महाराष्ट्रांतील भिल्ल, श्रीनिवास एम.एन. - दक्षिण भारतातील कूर्ग, श्रीवास्तव एल.एन.आर. - गॅलॉग, थारू जमाती, थर्स्टन ई - यांनी तोडा व कोटा या निलगिरी टेकडयांवरील जमातींची वांशिकता, निलगिरी पर्वतावरील बदग व इरूल्स, मलबारमधील पनियन, तामीळनाडूमधील चाईनेज, कुरूंबा इ. जमातींचा समाजशास्त्रीय अभ्यास केल आहे. वर्मा के.के. संथाळ आणि बिरहोर जमाती, वर्मा

माणिकलाल - गाडेलिया लोहार जमात, विद्यार्थी एल.पी. - घागरा, व्यास एन.एन. - राजस्थान बॉर्डरवरील भिल्ल, वेल्लिंग ए - कातकरी समाज, झिम्मरमन आर. यांनी खंडयाळयातील कातकरी यांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला आहे.

आदिम जमातींचे पारंपरिक जीवन, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जीवन व त्यात झालेले परिवर्तन, देवक प्रथा इ. संदर्भात वरील मानववंश शास्त्रज्ञांनी संशोधन केलेले आढळते. वरील संशोधनात्मक वांङमयामुळेच सातारा येथील ' वैदु ' जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली व हा समाजशास्त्रीय अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

उ) <u>**तथ्य संकलनाच्या पध्दती**</u> ...

वैदु जमातीची सर्वसामान्य माहिती ही प्रकाशित ग्रंथाच्या आधारे मिळविली आहे. जवळ जवळ 500 पर्यंत लोकसंख्या व 100 घरे असल्याने ' नमुना - निवड - तंत्राची ' गरज भासली नाही. सर्व घरांचा ' सामाजिक सर्वेक्षण ' पध्दतीने अभ्यास केला आहे. यामध्ये 100 कुटुंब प्रमुखांची माहिती संकलित करण्यासाठी मुलाखत पध्दतीचा वापर केला आहे. मुलाखत पध्दती निवडण्याचे कारण म्हणजे येथील लोक अशिक्षित व भटके आहेत. त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधणे, एखादा प्रश्न जर त्यांना संदिग्ध वाटला तर तो स्पष्ट करून सांगणे, इतर प्रश्नांच्या साह्याने त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करून घेणे, त्यांच्या गृहजीवनाची पाहणी करणे व जास्तीत जास्त वास्तव माहिती मिळविणे हे याच पध्दतीने शक्य झाले. कुटुंब सदस्यसंख्या, विवाह, राहणीमान, शिक्षण, स्त्रियांचा दर्जा, धार्मिक प्रथा, इ. विषयीची प्रत्यक्ष परिस्थिती आणि दृष्टीकोन जाणून घेण्याच्या दृष्टीने हे प्रश्न निवडले आहेत. काही प्रश्न खुले आणि काही बंद स्वरूपाचे आहेत ही प्रश्नसूची परिशिष्ट नं. 1 मध्ये जोडली आहे. काही विशेष गोष्टींच्या संदर्भात तथ्य संकलन करण्यासाठी जमातीतील महत्वाच्या व्यक्ती यामध्ये वृध्द पुरुष, स्त्रिया, जमातीतील तरुण कार्यकर्ते, पारंपरिक व्यवसाय करणारे वैदु अशा दहा मुलाखती घेतल्या आहेत. काही मुलाखती कॅसेटवर टेप करून घेतल्या आहेत. त्यांच्यातील सण, जत्रा, विवाह समारंभाविषयी माहिती घेण्यासाठी छायाचित्रे आहेत. ती परिशिष्ट नं.2 मध्ये जोडली आहेत.

मिळालेल्या माहितीचे लोकसंख्या, वैवाहिक स्थिती, व्यवसाय, शिक्षण इ. गट पाडून समानतेनुसार गट तयार करून त्यांचे वर्गीकरण केले आहे. यानुसार त्यांचे विश्लेषण व विवेचन केले आहे. जरूर तेथे आलेख स्तंभांचा वापर केला आहे.

वरील पध्दतीने वैदु जमातीची लोकसंख्या, वैवाहिक स्थिती, व्यवसाय, शिक्षण, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवन यासंबंधी निष्कर्ष मांडले आहेत.

या कुटुंब प्रमुखांनी मुलाखात देण्याची तयारी दाखविली म्हणून सोईस्कर पध्दतीने मुलाखात घेणे शक्य झाले. प्रत्येक कुटुंब प्रमुखाची मुलाखात व कांही लोकांच्या विशेष मुलाखाती यामुळे निघणारे निष्कर्ष हे जास्तीत जास्त अचूक काढण्याचा उद्देश साध्य झाला आहे.

(ऊ) **अभ्यास करताना आलेल्या अडचणी** ...

हे लोक अशिक्षित असल्याने मुलाखात घेण्याचा उद्देश प्रथम त्यांना पटवून द्यावा लागला. त्यांना मिळणा-या राजकीय सवलती बंद होणार नाहीत, माहितीचा गैरवापर केला जाणार नाही हे स्पष्ट केल्यानंतरच मुलाखाती दिल्या गेल्या.

विशेषत: वैदुंचे या आधीचे वसतीस्थान ' भीमाबाई आंबेडकरांची समाधी ' हे ठिकाण सध्या मातंग समाजाच्या अधिकारात असल्याने त्या ठिकाणचे छायाचित्र घेताना या लोकांनी विरोध केला. त्यांचा हक्क हिरावून घेतला जाणार नाही अशी हमी दिल्यानंतर व छायाचित्राची गरज का आहे हे स्पष्ट केल्यानंतर या लोकांनी छायाचित्र घेऊन दिले. वैदु लोक भटके असल्याने दिवसा त्यांच्याशी संपर्क साधणे अशक्य आहे. म्हणून त्यांच्या सोयीने सकाळ, दुपार, रात्री कांही वेळा त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी जाऊन या मुलाखाती घ्याव्या लागल्या.

**अभ्यासाच्या मर्यादा** ...

हे लोक भटकत असल्यामुळे मुलाखातीच्या वेळी सर्व लोकांशी संपर्क साधणे अशक्य झाले. कांही लोक हे वर्षातून एकदाच येतात. अशा लोकांशी संपर्क साधता आला नाही. साताऱ्च्या जनगणनेच्या यादीनुसार वैदु लोकांची सख्या ही 1275 आढळते. परंतु येथे कायम राहणारे लोक हे 447 पर्यंतच असल्याने तीच संख्या प्रमाण मानून अभ्यास करावा लागला.

(ए) **संशोधन आराखडा** ...

प्रस्तुत शोध निबंधाचे पाच प्रकरणांमध्ये विभाजन केले आहे.

* प्रकरण 1 मध्ये भटक्या जमातींचा परिचय देण्यात आला आहे.
* प्रकरण 2 मध्ये सातारा शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी व वैदुंच्या निवास स्थानाविषयी - कामाठीपुरा विभागाची भौगोलिक माहिती दिली आहे.
* प्रकरण 3 मध्ये वैदुंची सामाजिक, सांस्कृतिक, व्यावसायिक, धार्मिक जीवनाची माहिती दिली आहे.

* प्रकरण 4 मध्ये भटक्या जमातींविषयी यापूर्वी झालेला अभ्यास, अभ्यास विषयाचे स्वरूप, अध्ययन पध्दती व सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण दिले आहे.

* प्रकरण 5 मध्ये वैदुंचे जीवन व एकंदरित तथ्य संकलनावरून निष्कर्ष मांडले आहेत.

यानंतर परिशिष्ट 1 मध्ये वैदुंच्या मुलाखातींची व विशेष मुलाखातींची प्रश्नावली, परिशिष्ट 2 मध्ये आवश्यक छायाचित्रे, परिशिष्ट नं. 3 मध्ये जमातीतील प्रचलीत गाणी, दंतकथा दिल्या आहेत.

शेवटी अभ्यास विषयाच्या संदर्भातील पुस्तकांची सूची मांडून निबंधाचा समारोप करण्यात आला आहे.

*******************

## ऐ) तथ्य संकलन - माहितीचे पृथ:करण आणि विश्लेषण ...

सातारा येथे कामाठीपुरा वार्ड नं. ११ मध्ये वैदु जमात १९३५ पासून रहात आहे. ही जमात येथे स्थिर स्वरूपाचे जीवन जगत असून तिचे पारंपरिक व्यवसाय व जीवनपध्दती बदललेली दिसते. या जमातीचा सामाजिक सर्वेक्षण पध्दती व मुलाखात तंत्रानुसार अभ्यास केला. यामध्ये वैदुच्या शंभर घरांचा अभ्यास केला आणि सांख्यिकीय स्वरूपाची माहिती पुढील प्रमाणे मांडून तिचे विश्लेषण या प्रकरणांत केले आहे.

### (अ) लोकसंख्या ...

सातारच्या वार्ड नं. ११ च्या जनगणना यादीत या जमातीची संख्या १२७५ अशी नोंदलेली आहे. हा समाज भटका असल्याने कायम रहाणारे वैदुंचा अभ्यास केला आहे. त्यानुसार या जमातीची लोकसंख्या 447 आढळून आली. ती प्रमाण धरून निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

सारणी क्रमांक (१)


एकूण लोकसंख्या ... 447

| अ.नं. | लिंग | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | पुरूष | ११9 | 26.63% |
| 2. | स्त्रिया | १2१ | 27.07% |
| 3. | मुले | १02 | 22.28% |
| 4. | मुली | १05 | 23.48% |
| | एकूण ... | 447 | १00% |

वरील कोष्टकावरून एकूण लोकसंख्येच्या प्रमाणांत पुरूषांचे शेकडा प्रमाण 26.63%, स्त्रियांचे शेकडा प्रमाण 27.07%, मुलांचे शेकडा प्रमाण 22.82% आणि मुलींचे शेकडा प्रमाण 23.48% दिसते. पुरूष व स्त्रियांचे प्रमाण यामध्ये स्त्रियांची संख्या जास्त आढळते. मुले व मुली यांच्या संख्येत मुलींची संख्या जास्त आढळते. हा समाज भटका असल्याने पुरूष लोक नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने बाहेर रहात असल्याने अशी तफावत आढळून येते. पुढील आलेखांत हे प्रमाण दाखविले आहे.

आलेख क्रमांक 4.1

वैदुंची एकूण लोकसंख्या दर्शविणारा आलेख



2. सातारा शहर, कामाठीपुरा वार्ड व वैदु यांच्या लोकसंख्येची तुलना या सारणीत केली आहे.

सारणी क्रमांक (2)


तुलनात्मक लोकसंख्या

| अ.नं. | स्थान | स्त्री | पुरूष | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1. | सातारा शहर | 45,373 | 49,757 | 95,133 |
| | | (47.69%) | (52.30%) | (100%) |
| 2. | कामाठीपुरा वार्ड नं. 11 | 2,460 | 2,754 | 5,214 |
| | | (2.58%) | (2.89%) | (100%) |
| 3. | वैदुवाडी | 299 | 218 | 447 |
| | | (0.24%) | (0.23%) | (0.47%) |

सातारा शहर, कामाठीपुरा वार्ड नं. 11 व वैदुवाडी यांच्यातील स्त्री व पुरुषांची लोकसंख्या तुलनात्मक पुढीलप्रमाणे आढळून येते. सातारा शहरांत पुरूषांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या दृष्टीकोनांतून 52.30% आहे. कामाठीपुरातील पुरूषांचे प्रमाण शहराच्या एकूण लोकसंख्येच्या 2.89% आणि वैदु जमातीच्या पुरूषांचे प्रमाण शहराच्या एकूण लोकसंख्येच्या 0.23% इतके आढळते. सातारा शहरातील स्त्रियांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या 47.69% आहे. कामाठीपुरामध्ये स्त्रियांचे प्रमाण शहराच्या एकूण लोकसंख्येच्या 2.58% इतके आहे. वैदुवाडीतील स्त्रियांचे प्रमाण शहराच्या एकूण लोकसंख्येच्या 0.28% इतके आढळते. सातारा व कामाठीपुरा वार्डच्या लोकसंख्येनुसार पुरूषांचे प्रमाण स्त्रियांपेक्षा अधिक आढळते. परंतु वैदुंमध्ये पुरूषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण जास्त आढळते याचे कारण या जमातीतील पुरूष नोकरी व व्यवसायाच्या निमित्ताने बाहेरगांवी रहातात. हे प्रमाण पुढील आलेखात दाखविले आहे.

## आलेख क्रमांक 4.2

### सातारा शहर - कामाठीपुरा - वैदुवाडी
### तुलनात्मक लोकसंख्या दर्शविणारा आलेख




| | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| सातारा शहर | 49750 | 45376 | 95133 |
| कामाठीपुरा | 2754 | 2460 | 5214 |
| वैदुवाडी | 229 | 214 | 447 |

3. कामाठीपुरा व वैदुवाडी यांच्या लोकसंख्येची तुलना केल्यानंतर ह्या लोकसंख्येचे विभाजन पुढीलप्रमाणे दिसून येते.

सारणी क्रमांक (3)


कामाठीपुरा वार्ड ।। व वैदुवाडी यांच्या लोकसंख्येची विभागणी.

| अ.नं. | लिंग | कामाठीपुरा | वैदुवाडी | शेकडा प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | कामाठीपुरा | वैदुवाडी |
| 1. | स्त्री | 1856 | 121 | 35.60% | 2.32% |
| 2. | पुरूष | 2312 | 119 | 44.34% | 2.28% |
| 3. | मुली | 604 | 105 | 11.58% | 2.01% |
| 4. | मुले | 442 | 102 | 8.48% | 1.95% |
| | एकूण | 5214 | 447 | 100.00% | 8.56% |

कामाठीपुरा वार्ड नं. ।। च्या एकूण लोकसंख्येच्या 8.56% इतकी वैदुंची संख्या आहे. कामाठीपु-यांतील स्त्रियांची संख्या एकूण लोकसंख्येच्या 35.60% आहे तर वैदुवाडीतील स्त्रियांची वार्डच्या लोकसंख्येच्या 2.32% संख्या आढळते. पुरूषांमध्ये कामाठीपु-यांतील पुरूषसंख्या वार्डच्या एकूण लोकसंख्येच्या 44.34% व वैदुवाडीतील पुरूषसंख्या वार्डच्या एकूण लोकसंख्येच्या 4.48% आढळते. मुलांची संख्या पहाताना एकूण लोकसंख्येच्या 8.48% कामाठीपु-यातील मुलांची संख्या आढळते. वैदु मुलांची संख्या वार्डच्या एकूण लोकसंख्येच्या 1.95% आहे. कामाठीपु-यातील मुलींची संख्या एकूण वार्डच्या लोकसंख्येच्या 11.58% आणि वैदुवाडीतील मुलींची संख्या एकूण वार्डच्या लोकसंख्येच्या 2.01% आढळते. वार्डच्या लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण पुरूषापेक्षा कमी आढळते तर वैदुवाडीच्या लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण पुरूषापेक्षां अधिक आढळते. दोन्ही वार्डमध्ये मुलींची संख्या मुलांपेक्षा जास्त आढळते. या भागात कोल्हाटी, नंदीवाले, वैदु अशा जमाती असल्याने कुटुंब नियोजन फारसे केले गेलेले नाही. एकच मुलगा व अनेक मुली अशी अनेक कुटुंबे या जमातीत आहेत. पुढील आलेखात हे प्रमाण दाखविले आहे.

## आलेख क्रमांक 4.3

### वैदु समाजाची वयोगटानुसार विभागणी दर्शविणारा आलेख.




| | पुरुष | स्त्रिया | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| कामाठीपुरा | 2312 | 1856 | 442 | 604 | 5214 |
| वैदुवाडी | 119 | 121 | 102 | 105 | 447 |

4. वैदु समाजाची वयोगटानुसार विभागणी पुढीलप्रमाणे आढळते.

सारणी क्रमांक (4)


वयोगटानुसार विभागणी

| अ.नं. | वयोगट | पुरूष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1. | 1 ते 20 वर्षे | 102 | 105 | 207 |
| | | (22.81%) | (23.49%) | (46.30%) |
| 2. | 21 ते 40 वर्षे | 81 | 83 | 164 |
| | | (18.12%) | (18.56%) | (36.68%) |
| 3. | 41 ते 60 वर्षे | 27 | 09 | 16 |
| | | (6.04%) | (6.48%) | (12.52%) |
| 4. | 61 ते 80 वर्षे | 27 | 09 | 16 |
| | | (1.56%) | (2.01%) | (3.57%) |
| 5. | 81 ते पुढे | 01 | 03 | 04 |
| | | (0.22%) | (0.67%) | (0.89%) |
| | एकूण | 218 | 229 | 447 |
| | | (48.76%) | (51.24%) | (100%) |

वरील सारणीवरून वैदु समाजात स्त्रियांचे प्रमाण पुरूषापेक्षा अधिक आढळते. मुलांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे 46.30% आढळते. 21 ते 40 व 41 ते 60 या वयोगटातील काम करण्यास सक्षम अशा लोकांचे प्रमाण 49.2% आहे. 61 ते 81 अशा वयोगटातील वृध्दांचे प्रमाण 4.46% आहे. यावरून या समाजात मुले व वृध्द लोकांचे प्रमाण 50.76% असल्याचे आढळते. हे लोक कमविण्यास असमर्थ आहेत. त्यामुळे जमातीचे एकंदरित रहाणीमान निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळते. पुढील आलेखांत हे प्रमाण दाखविले आहे.

आलेख क्रमांक 4.4

वैदु समाजाची वयोगटानुसार विभागणी दर्शविणारा आलेख



सारणी नं.5 ... कुटुंब प्रमुख ...

सामाजिक सर्वेक्षणामध्ये मिळालेल्या माहिती वरून या जमातीत स्त्री व पुरूष (दोघांपैकी कोणीही एक) कुटुंबप्रमुख असल्याचे आढळते. 100 कुटुंबाच्या केलेल्या पहाणीत 84 कुटुंब प्रमुख पुरूष व 16 कुटुंब प्रमुख स्त्रिया आढळून आल्या. या स्त्रिया विधवा किंवा परित्यक्ता आहेत. अशा कुटुंबामध्ये मुले मोठी झाल्यानंतर कुटुंब प्रमुख बनतात असे दिसते. अशी एकूण 4 कुटुंबे आढळून आली.

सारणी क्रमांक (5)

कुटुंब प्रमुखांची वैवाहिक स्थिती


| अ.नं. | वैवाहिक स्थिती | पुरूष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1. | विवाहित कुटुंब प्रमुख | 76 | 02 | 78 |
| 2. | अविवाहित कुटुंबप्रमुख | 04 | .. | 04 |
| 3. | विधवा कुटुंबप्रमुख | .. | 14 | 14 |
| 4. | पुनर्विवाहित कुटुबप्रमुख | .. | .. | .. |
| 5. | विधुर कुटुंबप्रमुख | 04 | .. | 04 |
| | एकूण ... | 84 | 16 | 100 |

( वैदु जमात ही पुरूष प्रधान जमात आहे. कुटुंब प्रमुख मृत झाला किंवा कुटुंब प्रमुखाने पत्नीस सोडून दिले तर अशा घरात स्त्री कुटुंबप्रमुख बनताना आढळते.)

वैदु जमात ही द्रविडीयन संस्कृतीतील आहे. प्रामुख्याने ही जमात पूर्वी मातृसत्ताक असावी. या जमतीत कुटुंब पध्दतीमध्ये बदल होत जाऊन आता ही जमात पितृसत्ताक पध्दतीची बनली आहे. या जमातीत पुरूष कुटुंबप्रमुख मृत झाला तर स्त्री कुटुंबप्रमुख बनते. यावरून ही जमात पूर्वी मातृसत्ताक पध्दतीची असावी असे सिध्द होत. कुटुंबप्रमुखांचे वैवाहिक स्थितीपुसार प्रमाण पुढील आलेखांत दाखविले आहे.

आलेख क्रमांक 4.5

कुटुंब प्रमुखांची स्थिती दर्शविणारा आलेख



## सारणी क्रमांक (6)


### वैवाहिक स्थितीनुसार लोकसंख्येचे विभाजन

| अ.नं. | वैवाहिक स्थिती | पुरूष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1. | विवाहित | 93<br>(21.80%) | 96<br>(21.47%) | 189<br>(42.28%) |
| 2. | अविवाहित | 120<br>(26.85%) | 103<br>(23.04%) | 223<br>(49.88%) |
| 3. | विधवा | .. | 30<br>(6.71%) | 30<br>(6.71%) |
| 4. | विधुर | 05<br>(1.1%) | ..<br>.. | 05<br>(1.1%) |
| | एकूण ... | 218<br>(48.76%) | 229<br>(51.24%) | 447<br>(100%) |

या जमातीमध्ये 93 पुरूष व 96 स्त्रिया विवाहित आहेत. यापैकी तीन स्त्रिया परित्यक्ता आहेत. अविवाहितांची संख्या 223 आढळते. कारण या जमातीत 1 ते 20 या वयोगटाची संख्या जास्त आहे. विधवा 30 व विधुर पाच आढळून आले. विधवा स्त्रियांमध्ये वयाचे प्रमाण 35 पेक्षा जास्त आहे. विधुर लोकांमध्ये वयाचे प्रमाण 50 च्या पेक्षा जास्त आहे. हे प्रमाण पुढील आलेखात दाखविले आहे.

आलेख क्रमांक 4.6

वैवाहिक स्थितीनुसार लोकसंख्येचे विभाजन दर्शविणारा आलेख



साक्षरता प्रमाण ...

कुटुंब प्रमुखांची साक्षरतेच्या दृष्टीकोनातून पहाणी केल्यानंतर कुटुंब प्रमुखांमध्ये 49 पुरूष साक्षर आहेत. 35 पुरूष निरक्षर आहेत. स्त्री कुटुंब प्रमुखांमध्ये साक्षरता आढळून आली नाही. 15 कुटुंब स्त्रिया निरक्षर आहेत.

सारणी क्रमांक (7)

कुटुंब प्रमुखांचे साक्षरता प्रमाण

| अ.नं. | साक्षर / निरक्षर | पुरूष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1. | साक्षर | 49 | .. | 49 |
| 2. | निरक्षर | 35 | 16 | 51 |
| | एकूण .. | 84 | 16 | 100 |

साक्षर कुटुंब प्रमुखांमध्ये शिक्षणाची मर्यादा पुढीलप्रमाणे दिसून येते.

सारणी क्रमांक (8)

साक्षर कुटुंब प्रमुखांतील शिक्षणाची मर्यादा

| अ.नं. | शिक्षण मर्यादा | .. | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1. | प्राथमिक शिक्षण | .. | 29 | 60% |
| 2. | दुय्यम शिक्षण | .. | 15 | 30% |
| 3. | महाविद्यालयीन शिक्षण | .. | 04 | 8% |
| 4. | तांत्रिक शिक्षण | .. | 01 | 2% |
| | एकूण .. | .. | 49 | 100% |


वरील सारणीवरून कुटुंब प्रमुखांमध्ये प्राथमिक शिक्षण घेणारांची संख्या दुय्यम व महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या कुटुंब प्रमुखांच्या तुलनेत जास्त आढळते. तांत्रिक शिक्षण घेतलेला एकच कुटुंब प्रमुख दिसतो. शिक्षणापेक्षा वैदु लोक किरकोळ व्यवसाय करताना दिसतात कारण उपजीविकेसाठी व्यवसाय स्वीकारणे हाच त्यांच्यापुढे एकमेव उपाय आढळतो. हे प्रमाण पुढील आलेखांतून दाखवले आहे.

## आलेख क्रमांक 4.7

## कुटुंब प्रमुखातील साक्षरता दर्शविणारा आलेख




| | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|
| साक्षर | 49 | 00 |
| निरक्षर | 35 | 16 |
| एकूण | 84 | 16 |



आलेख क्रमांक 4.8

कुटुंब प्रमुखातील शिक्षणाची मर्यादा दर्शविणारा आलेख



एकूण वैदु जमातीतील साक्षरतेची पहाणी केली तेव्हां ती पुढीलप्रमाणे आढळली.

<u>सारणी क्रमांक (9)</u>


वैदु जमातीची लिंगभेदानुसार साक्षरता

| अ.नं. | शैक्षणिक मर्यादा | स्त्री | पुरूष | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1. | प्राथमिक शिक्षण घेतलेले | 27<br>(9.85%) | 42<br>(15.32%) | 69<br>(25.18%) |
| 2. | प्राथमिक शिक्षण घेणारे | 60<br>(21.69%) | 51<br>(18.61%) | 111<br>(40.51%) |
| 3. | माध्यमिक शिक्षण घेतलेले | 06<br>(2.18%) | 23<br>(8.39%) | 29<br>(10.58%) |
| 4. | माध्यमिक शिक्षण घेणारे | 15<br>(5.47%) | 20<br>(6.29%) | 35<br>(12.77%) |
| 5. | उच्च माध्यमिक शिक्षण घेणारे | 03<br>(1.09%) | 06<br>(2.18%) | 09<br>(3.28%) |
| 6. | उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले | 03<br>(1.09%) | 03<br>(1.09%) | 06<br>(2.18%) |
| 7. | महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले | 03<br>(1.09%) | 03<br>(1.09%) | 06<br>(2.18%) |
| 8. | महाविद्यालयीन शिक्षण घेणारे | 02<br>(0.72%) | 07<br>(2.55%) | 09<br>(3.28%) |
| | एकूण .. | 119<br>(43.44%) | 155<br>(56.56%) | 274<br>(100%) |

आलेख क्रमांक 4.9

वैदु जमातीची लिंगभेदानुसार साक्षरता दर्शविणारा आलेख

1) प्रा.शिक्षण घेतलेले
2) प्रा. शिक्षण घेणारे
3) माध्य. शिक्षण घेतलेले
4) माध्य. शिक्षण घेणारे
5) उच्च माध्य. शिक्षण घेणारे
6) उच्च माध्य. शिक्षण घेतलेले
7) महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले
8) महाविद्यालयीन शिक्षण घेणारे



या जमातीमध्ये स्त्रियांपेक्षा पुरूषांमध्ये साक्षरतेचे जास्त आढळून येते. प्राथमिक शिक्षण घेतलेल्या स्त्रियांपेक्षा प्राथमिक शिक्षण घेतलेले पुरूष जास्त दिसून येतात. प्राथमिक शिक्षण घेणा-यामध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त दिसते कारण या जमातीत मुलींची संख्या अधिक आहे. माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या व घेणा-या पुरूषापेक्षा स्त्रियांचे प्रमाण कमी दिसते. एकूण साक्षरतेच्या प्रमाणांत माध्यमिक, उच्च माध्यमिक, व महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले व घेणारे स्त्री पुरूष कमी आहेत. यावरून वैदु लोक अलीकडे शिक्षणाबद्दल जागृत झालेले दिसतात. सरकारने त्यांना दिलेल्या शैक्षणिक सवलतींचा ते लाभ घेत आहेत असे दिसते. ही जमात भटकी असून ही इतर जमातींपेक्षा त्यांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त आढळते याचे कारण सातारमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळांत मिशन-यांनी यांच्यातील कांही तरूणांना शिक्षण दिले. तसेच सातारा हे शहर शैक्षणिक दृष्टया प्रगत आहे. सातारा शहरामध्ये रहात असताना त्यांच्यावर शिक्षणाचा प्रभाव पडलेला दिसतो. हे प्रमाण पुढील आलेखामध्ये दाखविले आहे. (आलेख क्रमांक (9)..

**<u>व्यवसायानुसार विभागणी</u>** ...

सातारमधील वैदु जमातीचा औषध विक्रीचा पारंपरिक व्यवसाय पूर्णपणे बंद पडत आलेला आहे. उपजीविकेसाठी या लोकांनी बदलत्या सामाजिक वातावरणाशी तडजोड केलेली दिसते. सध्या हे लोक शासकीय, निमशासकीय नोक-या, किरकोळ व्यवसाय, कटलरी व्यवसाय, आचारी व्यवसाय, रिक्षा चालविणे, रिपेअरिंग करणे, टीनमेकर्स, गवंडीकाम, दुकानदारी इ. व्यवसाय करतात. कुटुंबप्रमुखामध्ये व्यावसायिक विभागणी पुढील प्रमाणे आढळते.

सारणी क्रमांक (10)


कुटुंब प्रमुखांची व्यावसायिक विभागणी

| अ.नं. | व्यवसाय | .. | .. | संख्या |
|---|---|---|---|---|
| 1. | नोकरी | .. | .. | 19 |
| 2. | भीक मागणे | .. | .. | 00 |
| 3. | किरकोळ व्यवसाय | .. | .. | 77 |
| 4. | औषध तयार करणे व विकणे | .. | .. | 04 |
| | एकूण | .. | .. | 100 |

व्यवसायाचे हे विभाजन पुढील आलेखात दाखविले आहे.

## आलेख क्रमांक 4.10

## कुटुंब प्रमुखाची व्यावसायिक विभागणी दर्शविणारा आलेख



*  कुटुब प्रमुखामध्ये किरकोळ व्यवसाय करणारे 77 लोक असून त्यांची व्यवसायानुसार विभागणी पुढील प्रमाणे आढळते.

सारणी क्रमांक (11)

कुटुंब प्रमुखातील किरकोळ व्यवसाय विभागणी


| अ.नं. | व्यवसाय | .. | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| 1. | आचारी व्यवसाय | .. | 01 | 1.3% |
| 2. | कटलरी व्यवसाय | .. | 38 | 49.3% |
| 3. | रिक्षा चालक | .. | 07 | 9.09% |
| 4. | रिपेअरिंग व्यवसाय | .. | 04 | 5.5% |
| 5. | टीनमेकर | .. | 22 | 28.6% |
| 6. | गवंडीकाम | .. | 02 | 2.6% |
| 7. | दुकानदारी | .. | 03 | 3.9% |
| | एकूण ... | .. | 77 | 100% |

किरकोळ व्यवसायामध्ये शेकडा 1.3% लोक आचारी, 49.3% कटलरी व्यवसाय, 9.9% रिक्षाचालक, 5.5% लोक रिपेअरिंग व्यवसाय, 28.6% टीनमेकर, 2.6% लोक गवंडीकाम व 3.9% लोक दुकानदारी व्यवसाय करतात.

वरील दोन सारणीवरून वैदुंनी परंपरागत औषधा विक्रीचा व्यवसाय सोडल्याचे दिसते. उपजीविकेसाठी हे लोक किरकोळ व्यवसाय करताना दिसतात. यामध्ये कटलरी व्यवसायात सर्वात जास्त (49.3%) लोक आहेत. यानंतर टीनमेकर्स (28.6%), रिक्षाचालक (9.09%), रिपेअरिंग (5.5%), दुकानदारी (3.9%), गवंडीकाम (2.6%) व आचारी काम (1.3%) लोक करतात असे दिसून येते. ही विभागणी पुढील आलेखात दाखविली आहे.

आलेख क्रमांक 4.11

कुटुंब प्रमुख किरकोळ व्यवसाय विभागणी दर्शविणारा आलेख



वैदु जमातीतील एकूण स्त्री व पुरूष यांच्या व्यवसायाचे प्रमाण पुढीलप्रमाणे आढळते.

सारणी क्रमांक (12)

वैदु जमातीचे व्यावसायिक प्रमाण


| अ.नं. | व्यवसाय | पुरूष | स्त्रिया | एकूण | शे.प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | कटलरी व्यवसाय | 41 | 72 | 113 | 57.65% |
| 2. | रिक्षा चालक | 09 | 00 | 009 | 4.59% |
| 3. | टीनमेकर | 33 | 00 | 033 | 16.83% |
| 4. | औषध्य विक्री | 04 | 00 | 004 | 2.04% |
| 5. | बेकरी | 01 | 00 | 001 | 0.5% |
| 6. | दुकान व्यवसाय | 10 | 01 | 002 | 1.02% |
| 7. | आचारी व्यवसाय | 01 | 00 | 001 | 0.5% |
| 8. | बॅग रिपेअरर् | 02 | 00 | 002 | 1.02% |
| 9. | गवंडीकाम | 04 | 02 | 006 | 3.06% |
| 10. | लॉक रिपेअरर् | 01 | 00 | 001 | 0.5% |
| 11. | स्टोव्ह रिपेअरर् | 01 | 00 | 001 | 0.5% |
| 12. | नोकरी | 19 | 05 | 024 | 12.24% |
| | एकूण | 126<br>(64.29%) | 80<br>(40.41%) | 196 | 100% |

वरील सारणीवरून एकूण लोकसंख्यंच्या 43.84% लोक व्यवसाय करणारे आहेत. यापैकी पुरूषांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या 28.18% इतके आहे तर स्त्रियांचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या 17.89% इतके दिसून येते. वरील व्यवसायामध्ये कटलरी व्यवसायाचे प्रमाण सर्वात जास्त (57.65%) आढळते. यानंतर टीनमेकर (13.83%) नोकरी (12.24%) व्यवसाय करताना दिसतात. स्त्रिया नोकरी, कटलरी व्यवसाय व गवंडीकाम करतात. कटलरी व्यवसायामध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरूषांपेक्षा जासत आहे. नोकरी व्यवसायामधील स्त्रिया शाळेत शिक्षिका आहेत. व्यवसायामध्ये

स्त्री पुरूषांमध्ये 2:3 असे प्रमाण दिसून येते. औषध विक्रीचा व्यवसाय अगदीच कमी प्रमाणांत (2.04%) करताना हे लोक आढळतात. कारण वैद्यकीय क्षेत्रांत प्रगती झाल्यामुळे यांचा व्यवसाय चालेनासा झाला आहे. वैदु लोक ही दवाखान्यांत जाऊन उपचार घेताना दिसतात. शासनाची मदत मिळाली तर जे लोक रिक्षाव्यवसाय, दुकान व्यवसाय, कटलरी व्यवसाय चांगल्या प्रमाणांत करू शकतील. हे प्रमाण पुढील आलेखांत दाखविले आहे.

आलेख क्रमांक 4.12

वैदु जमातीचे व्यावसायिक प्रमाण दर्शविणारा आलेख



मासिक उत्पन्न ...

मासिक उत्पन्नानुसार कुटुंब प्रमुखांची पुढील प्रमाणे स्थिती आढळते.

## सारणी क्रमांक (13)

मासिक उत्पन्नानुसार विभागणी


| गट क्रमांक | मासिक उत्पन्न गट | .. | संख्या |
|---|---|---|---|
| 1. | सांगता येत नाही | .. | .. |
| 2. | रू.100 पेक्षा कमी | .. | 00 |
| 3. | रू.100 ते 400 | .. | 01 |
| 4. | रू.400 ते 800 | .. | 13 |
| 5. | रू.800 ते 1200 | .. | 45 |
| 6. | रू.1200 ते अधिक | .. | 41 |
| | एकूण | .. | 100 |

वरील विभागणी पुढील आलेखांत दाखविली आहे.

मासिक उत्पन्नाच्या सारणीवरून या जमातीत रू.800 ते 1200 व रू.1200 हून अधिक या गटातील 86 कुटुंबे येतात. ही कुटुंबे आपल्या मुलभूत गरजा चांगल्या प्रकारे भागवू शकतात. 14 कुटुंबांचा राहणीमानाचा दर्जा निकृष्ट स्वरूपाचा दिसून येतो.

आलेख क्रमांक 4.13

मासिक उत्पन्नानुसार कुटुंबांची संख्या दर्शविणारा आलेख



## कुटुंब नियोजन ...

वैदु जमात व कामाठीपुरा वार्ड क्र.।। यांच्यातील जननक्षम जोडप्यांची माहिती घेतल्यानंतर कुटुंब नियोजनाच्या बाबतीत पुढील प्रमाणे तुलनात्मक संख्या आढळते.

सारणी क्रमांक (14)

कामाठीपुरा वैदुवाडी यांच्यातील कुटुंब नियोजनाचे तुलनात्मक प्रमाण.

| अ.नं. | स्थान | कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेले | इतर पध्दती वापरणारे | इतर पध्दती न वापरणारे | एकूण लोक संख्येत जनन क्षम जोडपी | एकूण संतती नियमन करणारे |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7. |
| 1. | कामाठीपुरा | 212 (54.35%) | 104 (26.67%) | 84 (21.84%) | 390 (4.06%) | 314 (80.51%) |
| 2. | वैदुवाडी | 68 (80%) | 08 (9.41%) | 09 (10.58%) | 85 (1.64%) | 76 (89.41%) |


1. कामाठीपुरा वार्ड क्र.।। व वैदुवाडी यांची वार्डच्या लोकसंख्येच्या तुलनेत जननक्षम जोडप्यांचे प्रमाण अनुक्रमे 4.6% व 1.64% आढळते.
2. वार्ड क्र.।। च्या एकूण जननक्षम जोडप्यांपैकी 54.35% लोकांनी संतती नियमन शस्त्रक्रिया केली आहे. 26.67% लोक इतर संतती प्रतिबंधक उपायांचा वापर करतात. संतती नियमन न करणा-या जोडप्यांचे प्रमाण 21.84% आहे.
3. वैदुवाडीतील एकूण जननक्षम जोडप्यांपैकी 80% लोकांनी संतती नियमन शस्त्रक्रिया केलेली आहे. 9.41% लोक इतर पध्दतींचा वापर करतात. संतती नियमन न करणा-या जोडप्यांचे प्रमाण 10.58% आहे..
4. कामाठीपुरा वार्डमध्ये एकूण जननक्षम जोडप्यांपैकी 80.51% लोक शस्त्रक्रिया व इतर पध्दतींचा वापर करताना आढळतात. तर वैदुवाडीमध्ये एकूण 89.41% लोक शस्त्रक्रिया व इतर पध्दतींचा वापर करतात.

5. यावरून वार्डच्या तुलनेत वैदुवाडीमध्ये कुटुंब नियोजन करणा-या व इतर प्रतिबंधक उपाय वापरणा-या लोकांची संख्या जास्त आहे हे आढळून येते. यासाठी वैदु जमातीतील सामाजिक कार्यकर्ते व शासकीय आरोग्य अधिकारी यासाठी जमातीचे आरोग्य विषयक प्रबोधन करण्यांत आलेले आहे.

पुढील आलेखांत हे प्रमाण मांडलेले आहे.

आलेख क्रमांक 4.14

कामाठीपुरा व वैदुवाडी कुटुंब नियोजनाचे तुलनात्मक प्रमाण दर्शविणारा आलेख



**राहणीमान** ...

या जमातीने सध्याची रहाण्याची जागा पन्नास वर्षापूर्वी स्वतः 500 रुपयास विकत घेतली आहे. ही घरे वैदुंच्या मालकीची आहेत. याशिवाय शासनाकडून या लोकांना जागा मिळाली आहे. या वसाहतीत सार्वजनिक संडास, सार्वजनिक नळ आहेत. बंदिस्त गटारे नाहीत. एकूण 100 घरे आहेत. घरांचा प्रकार व सुखसुविधा यांचे प्रमाण पुढील प्रमाणे आढळते.

सारणी क्रमांक (15)

घराचा प्रकार

| अ.नं. | घराचा प्रकार .. | संख्या |
|---|---|---|
| 1. | पत्र्याच्या भिंती व छत असणारी .. | 95 |
| 2. | कच्च्या विटा व पत्र्याचे छत असणारी.. | 05 |
| | एकूण .... .. | 95 |

सारणी क्रमांक (16)

घरातील सुखसुविधा

| अ.नं. | सुखसोयी .. .. | संख्या |
|---|---|---|
| 1. | पाणी ( नळ ) .. | 88 |
| 2. | वीज .. .. | 77 |
| 3. | न्हाणीघर .. .. | 56 |
| 4. | रेडिओ .. .. | 40 |
| 5. | टेपरेकॉर्डर .. .. | 06 |
| 6. | फ्रीज .. .. | 01 |
| 7. | टी.व्ही. .. .. | 12 |
| 8. | व्ही.सी.आर. .. | 01 |
| 9. | भांडयाचे रॅक, कॉट, टी.पॉय इ. .. | 05 |
| 10. | कॅमेरा .. .. | 02 |

वरील माहितीनुसार या जमातीतील पाच घरे कच्च्या विटांनी बांधलेली असून पत्र्याचे छत आहे. इतर घरे ( झोपडी ) चारी बाजूनी पत्रा व छतही पत्र्याचे अशा स्वरूपाची आहेत. एकाही घरात खाजगी संडास नाही. सांडपाण्यासाठी बंदिस्त गटारे नाहीत. न्हाणीघर हे घराच्या पाठीमागे दगड ठेऊन, आडोसा तयार करून बनविलेले आढळते, रेडिओ, टेपरेकॉर्डर, व्ही.सी.आर, टी.व्ही. ही करमणुकीचरी साधने जमातीमध्ये आढळतात. जमातीमध्ये स्वतःचे वाहन आढळले नाही.

<u>तथ्य संकलनामध्ये आढळून आलेल्या इतर गोष्टी</u> . . .

1. या लोकांनी प्रामुख्याने मिळावा व आपले जातभाई आहेत.
   उपजीविकेची निश्चित खात्री यामुळे सातारा येथे वस्ती केलेली आहे.
2. ही जमात अंतर्विवाही आहे.
3. या जमातीत हुंडा व वधुमूल्य प्रथा दोन्ही बंद झाल्या आहेत.
4. ही जमात बहुविवाही - यामध्ये बहुपत्नीविवाही आहे. पण जमातीत असे एकच उदाहरण आढळते.
5. एका कुटुंबात डुक्कर पाळले जातात. इतर दुय्यम व्यवसाय करीत नाहीत.
6. शेतक-याकडे धान्य मागण्याची प्रथा नाही.
7. रामस्वामी, यल्लम्मा, शंकर, हनुमान, गुरूदत्त इ. देवांची ही जमात पूजा करते. सातारा शहरातील इतर देवांना जातात.
8. घरात व सार्वजनिक ठिकाणी देवपूजा करतात.
9. या जमातीत अंगात येणारी एकही व्यक्ती आढळली नाही.
10. देवाच्या पूजेला उदबत्ती, नारळ, लिंबे, लाह्या, बत्तासे इ. पदार्थ वापरतात. बक-याचा बळी देतात.
11. देवासाठी खास भगत नाही.देवाची पूजा स्वतः करतात.स्वतः बक-याचा बळी देतात.
12. जातपंचायतीचे अस्तित्व आजही आहे. जातपंचायतीचे प्रमुखपद हे वय, प्रतिष्ठा व शहाणपणाच्या बळावर मिळते.
13. जातपंचायतीपुढे वैवाहिक जीवनातील अडचणी, कौटुंबिक भांडणे अशा प्रकारचे खटले सोडविले जातात.
14. शहरातील इतर लोक यांच्या बाबतीत शिवाशिव पाळत नाहीत.
15. मागासलेली जमात म्हणून या लोकांना शैक्षणिक सवलती, नोकरीतील सवलती मिळतात.
16. ही जमात गुन्हेगार जमात नाही.